m Sonshi, rested on bstructing portation. 1 central after they stody, re- rkar. d bail on used to g they crime. n that otice their was ent. he eir al in g e

# Soon, Goa to get facility for declaring brain death

Times News Network

**Panaji:** Following a private city hospital making the state's first brain death declaration on Sunday, health minister Vishwajit Rane said he would initiate a facility at the Goa Medical College (GMC) and hospital, and other government hospitals to declare brain deaths on Thursday.

Rane made the statement after declaring Manipal Hospital in Dona Paula as the first hospital in the state to announce a case of brain death. The former Valpoi MLA said he has had meetings with GMC doctors.

A 71-year-old male, admitted at Manipal Hospital Goa, was declared brain dead after he suffered catastrophic brain haemorrhage.

Consultant nephrologist at Manipal Hospital, Dr Amol Mahaldar said the patient's family was intimated about his status and the available options were placed before them.

## BRAIN MATTERS

- Brain death occurs when a person has an irreversible, catastrophic brain injury that causes total cessation of all brain functions
- It is not a coma or a persistent vegetative state
- Organ/organs of person declared brain dead can be harvested for transplant, but subject to permission of the family



- To make a diagnosis and declare a patient 'brain dead' requires a panel of four doctors consisting of the doctor in charge of the patient, the doctor in charge of the hospital where the patient was treated, an independent specialist of an unspecified specialty and a neurologist or a neurosurgeon
- In March, the state government constituted a panel to facilitate declaration of brain deaths by hospitals

▶ Family objected, P 2

# मणिपाल हॉस्पिटलमध्ये 'ब्रेन डेथ'चा पहिला रुग्ण

प्रतिनिधी

पणजी

दोनापावला येथील मणिपाल हॉस्पिटलने मेंदू विकार झालेल्या आणि आयुष्य संपत आलेल्या महिला [illegible] वर्षीय रुग्णाचे त्यांच्या कौटुंबिक संमतीने ब्रेन डेथ निधन झाल्याचे जाहीर केले आहे. आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी मणिपाल हॉस्पिटलच्या या पुढाकाराचे स्वागत केले. अजून तीन रुग्णालय गोवा वैद्यकीय महाविद्यालय इस्पितळात राबवण्याचा इरादाही त्यांनी व्यक्त केला आहे.

ब्रेन डेथची माहिती देण्यासाठी मणिपाल हॉस्पिटलने एक कार्यक्रम आखला होता. त्यावेळी आरोग्यमंत्री उपस्थित होते. मणिपालच्या व्यवस्थापनाने सुरू केलेल्या या ब्रेन डेथ उपक्रमाचे स्वागत करून ते म्हणाले की सरकारने याची दखल घेतली असून त्यासाठी रुग्ण शोधून काढणे आणि त्याचे ब्रेन डेथ जाहीर करणे बांबोळी इस्पितळात होणे शक्य आहे. रुग्णांच्या कुटुंबाला या मोहिमेत सामील करून घेऊन त्यांना दिलासा देऊ शकतो. इतकेच नव्हे तर त्या रुग्णाचे इतर अवयव इतरांसाठी वापरात येऊन वरदान ठरू शकतात असेही आरोग्यमंत्र्यांनी नमूद केले. मणिपाल हॉस्पिटमध्ये पहिल्या रुग्णाचे ब्रेन डेथ झाले. डॉ. शेखर साळकर व इतरांनी यासंदर्भात पत्रकारांना माहिती दिली.




पणजी : मणिपाल हॉस्पिटलच्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना आरोग्यमंत्री विश्वजित राणे. बाजूला डॉ. शेखर साळकर, डॉ. मुरली राव, डॉ. मेधा साळकर व डॉ. गिरीश.

### 'ब्रेन डेथ' म्हणजे काय?

'ब्रेन डेथ' विषयी अधिक माहिती देताना मणिपालच्या डॉक्टर्सनी सांगितले की शरीराचे इतर कोणतेही अवयव बदलता येतात परंतु मेंदू (ब्रेन) बदलता येत नाही. मेंदूचा विकार होऊन संबंधित रुग्णांचे आयुष्य जर संपुष्टात येणार असेल म्हणजे तो वाचत नसेल तर त्यास व्हेंटीलेटर तसेच इतर सामुग्री वापरून जगवण्यात काही अर्थ नाही. त्यामुळे व्हेंटीलेटर व इतर उपकरणे अडून राहतात आणि इतर गरजूंना ती वापरायला मिळत नाहीत. परिणामी इतर रुग्णांना वाचवणे कठीण होते. अशावेळी त्या रुग्णांच्या कुटुंबियांना याची जाणीव देऊन आणि योग्य ती कायदेशीर प्रक्रिया करून ब्रेथ डेथ केले जाते.

# गोमेकॉतही 'ब्रेन डेड' अवयव प्रत्यारोपण उपक्रम राबवणार

## आरोग्यमंत्री विश्वजित राणे : मणिपाल रुग्णालयात अवयव प्रत्यारोपण सेवा सुरू

पणजी, ता. २० (प्रतिनिधी) : मेंदू मृत झाल्यानंतर मानवाचे संपूर्ण शरीर निष्क्रिय होते. अशावेळी जर मेंदू मृत व्यक्तीच्या इतर अवयवांचा उपयोग ज्यांना त्या अवयवांची गरज आहे, त्यांच्यासाठी करून दिला, तर कदाचित हजारो मृत्यू रोखण्याचे श्रेय या उपक्रमाला जाईल. मणिपाल रुग्णालयाने गोवा सरकारच्या मदतीने सुरू केलेला अवयव प्रत्यारोपणाचा हा उपक्रम स्तुत्य असून, असाच उपक्रम गोवा वैद्यकीय महाविद्यालयही राबविणार आहे. या संदर्भात गोवा वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन प्रदीप नाईक यांच्याशी बैठक झालेली असून, याबाबतचा निर्णय लवकरात लवकर घेऊन हा उपक्रम सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




दोनापावला : मणिपाल रुग्णालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आरोग्यमंत्री विश्वजित राणे. (संदीप देसाई)

मणिपाल रुग्णालयाने नव्याने सुरू केलेल्या या उपक्रमाचा प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत भारतीय मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा मेधा साळकर, कर्करोगतज्ज्ञ शेखर साळकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

मेंदू मृत किंवा मेंदू निष्क्रिय होणे हा प्रकार संबंधित रुग्णाच्या नातेवाईकांना जास्त त्रास देणारा असतो. मेंदू मृत व्यक्तीच्या अवयवांमुळे इतर कोणाचे चांगले होणार असल्याची भावना अतिशय सुखावणारी असल्याने अशा व्यक्तींच्या अवयवदानाचा निर्णय त्या व्यक्तीच्या घरच्यांनी घ्यायला हवा, असा सल्लाही आरोग्यमंत्र्यांनी दिला.

शेखर साळकर म्हणाले, भारतामध्ये इतर राज्यांमध्ये हा उपक्रम सुरू असून, यामुळे अनेक लोकांचा जीव वाचला आहे. मणिपाल इस्पितळातर्फे चालविण्यात आलेला हा उपक्रम राज्यशासनाचाही असून याचा फायदा गोवा वैद्यकीय महाविद्यालयालाही होणार आहे. जेव्हा गोवा वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालयाला एखाद्या रुग्णासाठी अवयव प्रत्यारोपणाची गरज असेल, तेव्हा मणिपाल रुग्णालयातर्फे मदत केली जाणार आहे. जेव्हा गोव्यात या अवयवांचा उपयोग नसेल, तेव्हा ते बाहेरील राज्यांमध्ये गरज असेल, त्या ठिकाणी पाठवून लोकांना जीवदान देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अवयव प्रत्यारोपणाच्या बाबतीत लहान मुले आणि तरुण यांना प्रथम स्थान दिले जाणार आहे.

### ९९ टक्के महिला करतात अवयवदान

जिवंतपणी आपल्या एखाद्या जवळच्या नातेवाईकाला गरज आहे म्हणून अवयवदान करणे ही बाब दान करणाऱ्या व्यक्तीच्या शरीरासाठी घातक ठरू शकते. या अवयवदानाचा विचार करता दान करणाऱ्यांच्या संख्येमध्ये ९९ टक्के वाटा हा महिलांचा आहे. घरातील पुरुष कमावता असल्याने त्याची मिळकत बंद होऊ नये, यासाठी बऱ्याच महिला अवयवदान करतात. त्या संवेदनशील असल्याने त्यांना स्वतःच्या त्रासाचे काही वाटत नाही, असे डॉ. शेखर साळकर म्हणाले.